Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near
Balchitrawani, Behind Agharkar Research
Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,
१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च
इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 | EPABX -25705000 Fax : 25665807 |
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.मं./परीक्षा-२/३०११
पुणे-४११००४
दिनांक-२४/०६/२०२२

प्रती,

विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
सर्व विभागीय मंडळे,

विषय:-आय.टी.आय.च्या विद्यार्थ्यांचा निकाल तयार करणेसंदर्भात.
संदर्भ:-१)नाशिक विभागीय मंडळाचे पत्र क्र.नाविमं/७मा अ २/५६२ दिनांक १२/५/२०२२
२)मेजर आनंदराव घाटगे अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, व्हनाळी ता.कागल, जि.कोल्हापूर यांचे पत्र क्र. MAGITCV/113/2022 दिनांक ९/६/२०२२
३) श्री लक्ष्मीनारायण औद्योगिक प्रशिक्षण संस्था श्री शिवाजीनगर, ता.राहुरी, जि.अहमदनगर यांचे पत्र क्र.एस.एल.एन./२०२२/११९ दिनांक १४/६/२०२२

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित पत्रांस अनुसरुन कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या व औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) मधील व्यवसाय विषय घेऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना इ.१० वी व इ.१२ वी समकक्षता देण्यासाठी दिनांक २७ सप्टेंबर २०१८ च्या शासन निर्णयातील मुद्दा क्र.५ व ९ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

तसेच सदर विद्यार्थ्यांचा निकाल तयार करताना मंडळाच्या निकषानुसार विद्यार्थ्यास प्रत्येक विषयात किमान ३५ गुण मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस औद्योगिक प्रशिक्षण संस्थामार्फत प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत आय.टी.आय. च्या विषयांच्या उत्तीर्णतेच्या निकषानुसार मंडळामार्फत निकाल तयार करण्यासाठी संबंधित I.T.I. संस्थेने ३३ किंवा ३४ गुणांची उत्तीर्णता असलेल्या विषयाचे रुपांतर ३५ गुणात करून कळविणे आवश्यक आहे. सदर संस्थांकडून याप्रमाणे आय.टी.आय. च्या विषयांची संपादणूक मागवून घेण्यात यावी.

उपरोक्त बाब विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेत येणाऱ्या जिल्ह्यांमधील शासकीय व अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना(आय.टी.आय.) कळविण्यात यावी. व आय.टी.आय.च्या विद्यार्थ्यांची संपादणूक प्राप्त झाल्यानंतर इ.१० वी व इ.१२ वी च्या विद्यार्थ्यांचा सुधारित निकाल तयार करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

डॉ.अशोक भोसले,
सचिव,
राज्यमंडळ, पुणे-०४

क्र.मुंविमं/उमाप/ ११०८
वाशी नवी मुंबई-४०० ७०३.
दिनांक-२८.०६.२०२२

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
मुंबई विभागीय कार्यक्षेत्रातील
सर्व मान्यताप्राप्त शासकीय व अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था ( आय.टी.आय. )
मुंबई /बृहन्मुंबई / ठाणे / पालघर /रायगड जिल्हे.

उपरोक्त पत्रानुसार मुख्याध्यापक / प्राचार्यांनी आपल्या स्तरावर नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी.

(डॉ.सुभाष बोरसे)
विभागीय सचिव,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी नवी मुंबई- ४०० ७०३

प्रत योग्य त्या कार्यावाहीसाठी अग्रेषित :-
१ मा.शिक्षण उपसंचालक,मुंबई.
२ शिक्षणाधिकारी (माध्य.) मुंबई / ठाणे /रायगड .
३ शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई विभाग ( पश्चिम/दक्षिण/उत्तर ).
४प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय जव्हार/डहाणू/शहापूर/पेण/पालघर.
प्रत माहितीस्तव :- मा.सचिव, राज्यमंडळ,पुणे